बुधवार, दि १० सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक ३ रा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके


https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# जालना-खामगाव, जालना-बीड रेल्वे मार्ग मागणीसाठी आज 'जालना बंद'

**जालना । प्रतिनिधी -** ब्रिटिश शासनाकडून प्रस्तावित केलेला जालना -खामगाव हा रेल्वे मार्ग गेल्या सव्वाशे वर्षांपासून उपेक्षित आहे. सन २०११-१२ मध्ये या मार्गाला नव्याने मंजुरी मिळाली होती. सर्वेक्षणाच्या धीम्यागतीमुळे गाडी अडली. मात्र, हा मार्गच अर्थिकदृष्ट्या परवडणारा नसल्याने तो प्रलंबित ठेवण्याचा निर्णय खुद्द तत्कालीन रेल्वेमंत्र्यांनी त्यावेळी जाहीरही केला होता. २५ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या अर्थसंकल्पात पुंजी निवेश कार्यक्रमांतर्गत या मार्गासाठी तीन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. केंद्र, राज्य शासन आणि खाजगी तत्त्वावर मार्ग निर्माण करण्याचे नियोजित करण्यात आले. २०१६ चा अर्थसंकल्पात जालना -खामगाव रेल्वे मंजुर झाल्याचे खासदार रावसाहेब दानवे यांनी सांगून वाहवा मिळविली होती. मात्र, पुंजी निवेश कार्यक्रमअंतर्गत असल्यामुळे पुन्हा एकदा जालन्यासह विदर्भातील नागरिकांचा भ्रमनिरास झाला. या दरम्यान खरे तर रोखे घेण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता होती मात्र, तसे झाले नाही. त्यानंतरही जालना -खामगाव रेल्वे मार्ग पुन्हा चघळल्या गेला. जालना रेल्वे संघर्ष समितीच्यावतीने वेळोवेळी निवेदने देणे, आंदोलन करण्यात आली.

मात्र, अद्यापही प्रश्न अधांतरीच आहे. जालना- खामगाव रेल्वे मार्गाबरोबरच आता जालना- बीड हा रेल्वे मार्ग व्हावा यासाठीही रेल्वे संघर्ष समिती झटत आहे. समितीने आता जालना बंदची हाक दिली आहे. बुधवार (दि. १०) रोजी हा जालना बंद पुकारला असून यात नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

रेल्वे संघर्ष समितीच्या आवाहनानंतर विविध संघटनांनी त्यांना पाठींबा देत जालना बंद यशस्वी करण्याचा निर्धार केला आहे.




## मराठवाडा अनुशेष निर्मूलन व विकास मंचचा जाहीर पाठिंबा

जालना-खामगाव रेल्वे मार्गाच्या दीर्घकालीन मागणीसाठी रेल्वे संघर्ष समितीने बुधवार, दि. १० सप्टेंबर रोजी सकाळी तीन तासांचा जालना बंद पुकारला आहे. या बंदला मराठवाडा अनुशेष निर्मूलन व विकास मंचने जाहीर पाठिंबा दिला असून आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविण्याची भूमिका घेतली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रलंबित असलेला जालना-खामगाव रेल्वे मार्ग हा भागातील विकासाचे दार ठरू शकतो, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. हा रेल्वे मार्ग झाल्यास मराठवाड्यातील वंचित व मागास भागातील आर्थिक, शैक्षणिक व औद्योगिक विकासाला चालना मिळेल, यात शंका नाही. त्यामुळे शासनाने तातडीने ही मागणी मान्य करावी, अशी जोरदार भूमिका मंचने मांडली आहे.

याबाबत मंचचे अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील, कार्याध्यक्ष दिनेश फलके, सरचिटणीस सुभाष कोळकर, तसेच शरद देशमुख, राजेंद्र गोरे, माऊली कदम, डॉ. इनामदार, ॲड. उत्तर राठोड आदींनी संयुक्त निवेदनाद्वारे भूमिका स्पष्ट केली.

या आंदोलनामुळे जालना शहरात मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळण्याची शक्यता असून, शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बंद यशस्वी व्हावा यासाठी सर्व स्तरांतून आवाहन केले जात आहे.

# रोहित पवारांनी राजकीय संन्यास घ्यावा - आ. लोणीकर

## मेघा इंजिनिअरिंग प्रकरण: ९४ कोटी दंडाचा वाद; आमदार बबनराव लोणीकर यांचे रोहित पवारांना सडेतोड प्रत्युत्तर

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-सी (पंढरपूर-शेगाव) च्या बांधकामादरम्यान मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. हैद्राबाद यांनी जालना आणि परभणी जिल्ह्यातील परतूर तालुक्यात अनधिकृतपणे वाळू आणि दगड व मुरमचे उत्खनन केल्याने निर्माण झालेल्या ९४.६८ कोटी रुपये दंडाच्या वादाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि पर्यावरणीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी मंगळवार, (दि ९) रोजी जालना येथील श्री भक्ती निवासस्थानी दुपारी आयोजित पत्रकार परिषदेत सविस्तर खुलासे केले आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)चे आमदार रोहित पवार यांच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांना सडेतोड प्रत्युत्तर देत त्यांना राजकीय संन्यास घेण्याचा सल्ला दिला आहे. या पत्रकार परिषदेला राहुल लोणीकर यांच्यासह शेतकरी, पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

रोहित पवार यांनी ८ सप्टेंबर २०२५ रोजी 'एक्स'वर दावा केला की, बावनकुळे यांनी दंड माफ केला आणि १% रक्कम (१७.२८ लाख रुपये) भरून प्रकरण निकाली काढले. याला भ्रष्टाचार ठरवत त्यांनी विधानसभेतील बावनकुळे यांच्या उत्तराचा (११ जुलै २०२५) संदर्भ दिला. यावर आमदार बबनराव लोणीकर यांनी पत्रकार परिषदेत तीव्र प्रत्युत्तर दिले. रोहित पवार यांनी खोटी माहिती पसरवून जनतेची दिशाभूल केली. हे प्रकरण विखे पाटील यांच्या काळातील आहे. बावनकुळे यांच्यावर आरोप करणे चुकीचे आहे, असे लोणीकर म्हणाले. त्यांनी पवार यांना माफी मागण्यास किंवा राजकीय संन्यास घेण्यास सांगितले, ज्याला बावनकुळे यांनीही एक्सवर पाठिंबा दिला. आमदार बबनराव लोणीकर यांनी पुढे सांगितले की, पवार यांचे आरोप निराधार असून, त्यांनी विधानसभेतील उत्तराचा चुकीचा अर्थ लावला. १% रक्कम ही अपील प्रक्रियेसाठी होती, माफीसाठी नव्हे. संपूर्ण ९४.६८ कोटी रुपये वसूल होणार आहेत, असे लोणीकर यांनी स्पष्ट केले. स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांनी या प्रकरणात सीबीआय चौकशीची मागणी केली आहे, कारण मेघा इंजिनिअरिंगवर यापूर्वी भ्रष्टाचाराचे आरोप झाले आहेत (उदा., स्टील मिनिस्ट्री प्रकरण, एमएमआरडी कंत्राट रद्द). लोणीकर यांनी यावरही भाष्य केले की, शासन पारदर्शकपणे कारवाई करत आहे. कोणतीही चौकशीला आमची हरकत नाही, पण खोटे आरोप खपवून घेतले जाणार नाहीत.

मेघा इंजिनिअरिंग प्रकरणाबाबत आ. लोणीकर यांनी सविस्तर सांगतांना म्हंटले आहे की, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पालखी दिंडी मार्गाच्या बांधकामासाठी मेघा इंजिनिअरिंग ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. ही कंपनी कंत्राटदार म्हणून नियुक्त आहे. २०१८-१९ मध्ये कंपनीने परतूर तालुक्यात परवानगीशिवाय २६,६६६ ब्रास वाळू आणि ५२,१६६ ब्रास मुरमचे उत्खनन केल्याचा आरोप आहे. यामुळे शासनाला ९४.६८ कोटी रुपये महसुली तोटा झाला. महसूल विभागाने कंपनीवर दंड ठोठावला, ज्यात अपर जिल्हाधिकारी, जालना यांनी ३८.७० कोटी आणि तहसीलदार, परतूर यांनी ५५.९८ कोटी रुपये आकारले. कंपनीने या आदेशांना आव्हान देत अपील दाखल केले, जे अपर विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी फेटाळल्यानंतर तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सुनावणीसाठी गेले होते.



२१ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईत विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुनावणीत कंपनीने दंड माफ किंवा कमी करण्याची मागणी केली, कारण उत्खनन सार्वजनिक हिताच्या महामार्गासाठी होते. मात्र, विखे पाटील यांनी नियमांचे उल्लंघन आणि पर्यावरणीय नुकसान यावर भर दिला. शासनाच्या ठरावानुसार, दंडाच्या १% रक्कम (१७.२८ लाख रुपये) जमा करून प्रकरण तात्पुरते निकाली काढण्यात आले. यामुळे कंपनीचे जप्त साहित्य (५ क्रेन, १२ ट्रक) परत मिळाले असल्याचे सांगतांनाच आमदार बबनराव लोणीकर यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले की, ही स्थगिती होती माफी नाही, आणि संपूर्ण ९४.६८ कोटी रुपये स्थगिती उठविल्यानंतर वसूल होणार आहेत.

आमदार बबनराव लोणीकर यांनी मेघा इंजिनिअरिंग प्रकरणात शासनाच्या भूमिकेचा आणि दंड वसुलीच्या प्रक्रियेचा दृढ पाठपुरावा करत रोहित पवार यांचे आरोप खोडून काढले. त्यांनी ठामपणे सांगितले की, हे प्रकरण विखे पाटील यांच्या काळातील असून, बावनकुळे यांच्यावर दोष लावणे चुकीचे आहे. लोणीकर यांनी शेतकऱ्यांच्या पाणी समस्यांचा आणि पर्यावरणीय नुकसानाचा मुद्दा उपस्थित करत शासनाला पारदर्शक आणि कठोर कारवाईची मागणी केली.

# संपादकीय

## सव्वाशे वर्षांचा प्रवास अजूनही अधांतरी

जालना-खामगाव रेल्वे मार्ग हा मराठवाडा-विदर्भातील नागरिकांचा सव्वाशे वर्षांचा प्रलंबित स्वप्नवत प्रकल्प आहे. ब्रिटिशांच्या काळात प्रस्तावित झालेला हा मार्ग कालांतराने विविध कारणांनी मागे पडत गेला. २०११-१२ मध्ये नव्याने मंजुरी मिळूनही सर्वेक्षणाच्या संथगतीमुळे प्रकल्प रुळावर येऊ शकला नाही. त्यातच तत्कालीन रेल्वेमंत्र्यांनी हा मार्ग अर्थिकदृष्ट्या तोट्यात जाणारा असल्याचे सांगत थेट नकाराची भाषा केली. २०१६ च्या रेल्वे अर्थसंकल्पात मात्र या मार्गासाठी पुंजी निवेश कार्यक्रमांतर्गत तीन हजार कोटींची तरतूद जाहीर झाली. केंद्र, राज्य व खाजगी गुंतवणुकीतून मार्ग उभारण्याचा विचार मांडण्यात आला. त्यावेळी स्थानिक खासदार रावसाहेब दानवे यांनी ही मंजुरी मिळवून राजकीय श्रेय घेतले, मात्र प्रत्यक्षात हा प्रकल्प ‘पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप’मध्ये टाकल्याने अपेक्षित निधी उभारला गेला नाही आणि जनतेची पुन्हा दिशाभूल झाली. या दरम्यान रेल्वे संघर्ष समितीने बैलगाडी मोर्चा, निवेदने, आंदोलने करून प्रश्न जिवंत ठेवला. तरीही मार्ग पुढे सरकला नाही. केवळ जालना-खामगाव नव्हे तर जालना-बीड रेल्वे मार्गाचीही मागणी आता तीव्र झाली आहे. दोन्ही मार्ग आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असून, मराठवाडा-विदर्भाला औद्योगिक व व्यापारी संधींची नवी दारे उघडू शकतात. याच पार्श्वभूमीवर १० सप्टेंबरला पुकारण्यात आलेला जालना बंद ही केवळ एकदिवसीय निदर्शने नसून, लोकांच्या अपूर्ण आशा-अपेक्षांचा उद्रेक आहे. विविध संघटना या बंदला पाठिंबा देत असल्याने नागरिकांचा संताप स्पष्टपणे अधोरेखित होतो. एखाद्या प्रकल्पाच्या नावाने वारंवार लोकांना झुलवत राहणे आणि निवडणुकांमध्ये आश्वासनांचा पाऊस पाडणे, पण प्रत्यक्षात कृती न करणे - हा राजकीय संस्कृतीचा भाग का बनतो? रेल्वे मार्ग उभा राहिल्यास स्थानिक उद्योग, शेती, व्यापार आणि प्रवास या सर्व क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडतील हे सर्वांनाच ठाऊक असताना, खरे प्रयत्न का होत नाहीत? आजचा बंद यशस्वी होवो अथवा न होवो, परंतु रेलगाड्या खऱ्या अर्थाने धावाव्यात हीच खरी यशोगाथा ठरेल. रेल्वे संघर्ष समितीचा लढा हा केवळ जालन्यापुरता मर्यादित नसून, तो मराठवाडा-विदर्भाच्या विकासाच्या आकांक्षांचा लढा आहे. त्यामुळे आता फक्त आश्वासनांचा बंदोबस्त न करता, प्रत्यक्ष निधी, ठोस नियोजन आणि तातडीच्या कृतीने हा मार्ग रुळावर आणणे हीच खरी काळाची गरज आहे.

# एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात ठेवणे काळाची गरज!

एकेकाळी घरोघरी एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात होती. त्यामुळे घरोघरी सुखी, समाधानी व आनंदी वातावरण पाहायला मिळायचे. एकमेकांच्या मदतीला धावून जाणे, एकमेकांना आर्थिक मदत करणे, एकमेकांच्या सुखदुःखात धावून जाणे आणि एकमेकांना मायेने व आपुलकीने बोलणे हे सारे एकत्र कुटुंब पद्धतीत आपल्याला प्रकर्षाने पाहायला मिळायचे. त्याकाळी सख्ख्या भावांमध्ये प्रेम, माया व आपुलकी ठासून भरलेली होती. म्हणून तेव्हा भावंडांमध्ये कधीच आताच्या एवढे वाद-विवाद होत नव्हते. भाऊ भावाचा मनःपूर्वक आदर करत होता. एका भावावर संकट आले तर दुसरा भाऊ वाऱ्याच्या वेगाने धावून आपल्या भावाला आधार द्यायचा. एका भावाला दुःख झाले तर दुसऱ्या भावाला अतोनात वेदना व्हायच्या. छोटा भाऊ मोठ्या भावाचा आदर राखायचा. मोठ्या भावाचा विचार घेऊनच छोटा भाऊ पुढील वाटचाल करायचा. एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात असल्यामुळे आई वडील व आजी आजोबा यांचे एकत्र कुटुंबात मोलाचे योगदान असायचे. आई-वडिलांमुळे व आजी आजोबांमुळे लहान मुलांवर संस्काराची पेरणी अतिशय चांगल्या पद्धतीने व्हायची. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे एकमेकांबद्दल असणारा मायेचा ओलावा आणि एकमेकांबद्दल असणारी प्रेमाची व आपुलकीची भावना ही ठळकपणे दिसायची. लहान मुले व नातवंड आजी आजोबांच्या संस्कार छायेखाली लहानाचे मोठे व्हायचे. आजी आजोबा देखील त्यांना जिवापाड जपायचे. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे शेती सुद्धा एकत्र केली जायची. त्यामुळे शेतीमध्ये शेतमाल भरमसाठ व्हायचा. शेतीमध्ये आलेली बरकत पाहून शेतकरी आनंदात न्हाऊन निघायचे. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे प्रत्येक घरात व कुटुंबात एकमेकांबद्दल प्रेम, माया, आपुलकी व जिव्हाळा जणू काय मानवतेचा संदेश देत होता. घरोघरी माया, ममता व मानवता आनंदाने व सुखाने नांदत होती. एकत्र कुटुंब पद्धतीचा फायदा असा व्हायचा की, घरातील ज्येष्ठांना म्हणजेच वृद्ध आई-वडिलांना घराबाहेर काढून वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवणारे महाभाग एकत्र कुटुंब पद्धतीत अस्तित्वात नव्हते. कारण एकत्र राहिल्यामुळे माणसांमध्ये एकमेकांबद्दल प्रेम भावना वाढीस लागते. एकमेकांबद्दल लळा लागतो आणि त्यांच्यातील असलेले नातेसंबंध अधिक घट्ट होऊन ते वेळप्रसंगी एकमेकांवर जीव ओवाळून टाकायला सुद्धा तयार होतात. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे आपल्या घरावर वाईट नजरेने बघायची कोणाची हिंमत सुद्धा होत नाही. कारण एकत्र कुटुंब पद्धती एकीचे दर्शन घडवते. पण असे एकीचे दर्शन घडवणारी एकत्र कुटुंब पद्धती हल्ली कुठेच अस्तित्वात राहिली नाही. हीच या देशाची खरी शोकांतिका आहे. एकेकाळी एकत्र असणारे कुटुंब आता विभक्त झाले आहे. कारण काळानुसार माणसांमध्ये बदल होत गेला, माणसांची नीतिमत्ता बदलली, माणूस स्वार्थी व लोभी बनला. स्वतःसाठी आणि बायको मुलांसाठी जगणे हेच त्याचे जीवन ध्येय बनले आहे. म्हणजे आजकालचा माणूस आपल्याच बायको मुलांत गुरफटून गेला आहे. त्याला घरातील सदस्य म्हणजेच आई वडील, बहिण भाऊ, आजी आजोबा आणि समाजबांधव यांचा काहीही संबंध राहिलेला नाही. फक्त आपणच कसे मोठे व्हावे आणि आपल्याच जवळ सर्वात जास्त पैसा व संपत्ती कशी गोळा होईल हा विचार आजकालचा प्रत्येक माणूस करत आहे. म्हणतात ना चुलता, भाऊ, बहिण, आई वडील आणि आजी आजोबा हेच आपले असतात. पण आपली बायको व भावाची बायको ही आपली नसते. हे कदाचित खरे आहे, कारण यांच्यासोबत आपले रक्ताचे नातेसंबंध नसते. म्हणून यांना नवऱ्याच्या घरातील सदस्य नको वाटतात. मग मित्रहो, या बाया काय करतात? आपल्या नवऱ्याला भावाबद्दल, बहिणीबद्दल, आई-वडिलांबद्दल व आजोबांबद्दल भलतेच काहीतरी लावून देतात किंवा त्यांचे कान भरतात. आणि आपल्या पतीच्या नातेवाईकांबद्दल त्याच्या मनात द्वेष व तिरस्कार निर्माण करतात. आपल्या पतीला एकाचे दोन लावून देतात. आणि आजकालची मुले पत्नीचे ऐकून आई-वडिलांना, भावांना व आजी-आजोबांना अंतर देऊन एकत्र कुटुंब पद्धतीला छेद देऊन विभक्त कुटुंब पद्धतीचा अवलंब करत आहेत. आपल्या बायको मुलांना घेऊन कुठेतरी लांब नोकरीच्या ठिकाणी म्हणा किंवा शहरी भागात स्थायिक होऊन मनसोक्त राहतात. आणि पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगतात. ही वस्तुस्थिती सध्या आपण सर्वजण पाहत आहोत. कारण हल्ली माणसाचे मन कलुषित व गढूळ पाण्यासारखे झाले आहे. कारण आजकालच्या मुलांना शालेय शिक्षण म्हणावे तेवढे संस्कारक्षम व दर्जेदार मिळत नाही. शाळेत केवळ अभ्यासक्रम शिकवला जातो, अभ्यास क्रमाशिवाय इतर ज्ञानसंपदा किंवा संस्काराचे धडे आजकाल कोणत्याच शाळेत वा महाविद्यालयात दिले जात नाहीत. शिक्षक विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महत्त्व पटवून देत नाहीत. आई-वडिलांचे व आजी आजोबांचे महात्मे सांगणारे धडे आजकाल पुस्तकात समाविष्ट करणे काळाची गरज आहे. आई-वडिलांना अंतर देणे, त्यांना वृद्धाश्रमात पाठवणे, बहिण भावाचा शुल्लक कारणावरून अबोला धरणे आणि गुंठाभर जागेसाठी आपल्याच भावासोबत भांडण तंटा करणे हे सध्या सर्वत्र सर्रास सुरू आहे. याचे एकमेव कारण म्हणजे आजकालच्या पिढीला कुठेतरी संस्कार कमी पडलेत आणि त्यांना संस्कार देणे आणि त्यांना नात्याचे महत्त्व सांगणे ही सध्या काळाची गरज आहे. त्यासाठी शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महात्मे सांगणारा आणि त्यांना संस्काराचे धडे देणारा अभ्यास पुस्तकात समाविष्ट करून विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त चांगला सुसंस्कारी नागरिक बनवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. एकत्र कुटुंब पद्धतीचे महत्त्व पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांसाठी समाविष्ट करून विद्यार्थ्यांना चांगला माणूस बनवून आई-वडिलांना, आजी आजोबांना, बहिण भावांना व समाज बांधवांना अडीअडचणीत, सुखदुःखात, कठीण काळात व संकटात मदत करणे हे आपले परम कर्तव्य आहे. आजी आजोबा संस्काराची खान असतात. आजी आजोबांना कधीच अंतर देऊ नका, त्यांच्या विचारांना व आचारांना आचरणात आणून माणसासारखे जीवन जगूया... त्यासाठी एकाच घरात, एकाच छताखाली आणि शेत वाटणी न करता सगळ्यांनी मिळून सर्व शेती एकत्र करावी...बुद्ध, फुले शाहू, आंबेडकरांचे विचार आचरणात आणून एकत्र कुटुंब पद्धतीला महत्त्व द्यावे, सुरुवात आपल्यापासून करूया म्हणजे आपोआप आपली प्रेरणा घेऊन प्रत्येक जण एकत्र कुटुंब पद्धतीला प्राधान्य देईल असे मला वाटते.

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो. ७४९८७१५६६१**

# टी २० चा रणसंग्राम !

कालपासून ( ९ सप्टेंबर ) आखातातील दुबई आणि अबुधाबी येथे टी २० क्रिकेटचा रणसंग्राम सुरू झाला आहे. आशिया खंडातील क्रिकेटचा राजा कोण हे ठरवण्यासाठी भारतासह आशिया खंडातील आठ देश एकमेकांना भिडणार आहेत. या स्पर्धेत जो संघ विजयी होईल तो आशिया चषकावर स्वतःचे नाव कोरणार आहे. आशिया खंडातील भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि पात्रता फेरीत विजय मिळवून मुख्य स्पर्धेसाठी पात्र ठरलेले हाँगकाँग, संयुक्त अरब अमिराती ( युएई ) आणि ओमान या आठ संघात ही स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेतील पहिला सामना काल अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांच्यात झाला तर आज भारत आणि संयुक्त अरब अमिराती ( युएई ) यांच्यात लढत रंगणार आहे. वास्तविक आशिया चषकाची पात्रता फेरी याआधीच सुरू झाली असून या पात्रता फेरीत हाँगकाँग, संयुक्त अरब अमिराती ( युएई ) आणि ओमान हे संघ पात्र ठरले असून भारत, पाकिस्तान यांच्या गटात संयुक्त अरब अमिराती ( युएई ) आणि ओमान हे देश समाविष्ट झाले आहेत. दुसऱ्या गटात श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि हाँगकाँग हे देश आहेत. प्रत्येक गटातून दोन संघ असे एकूण चार संघ सुपर फोरसाठी पात्र ठरतील त्यांच्यात पुन्हा लढत होऊन दोन संघ अंतिम फेरीत पोहचतील. या स्पर्धेत आठ संघ खेळत असले तरी भारत आणि पाकिस्तान या दोन संघांना विजेतेपदासाठी पसंती दिली जात आहे. भारत आणि पाकिस्तान हे या स्पर्धेत प्रबळ दावेदार मानले जात असले तरी तरी श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान हे संघही चांगली तयारी करुन मैदानात उतरले आहेत त्यामुळे ही स्पर्धा रंगतदार ठरेल यात शंका नाही.

भारतासाठी ही स्पर्धा विशेष महत्वाची आहे कारण मागील तीन पैकी दोन स्पर्धेत ( २०१६ , २०१८, २०२३ ) भारताने विजेतेपद मिळवले आहे. २०२२ साली श्रीलंकेने आशिया चषकावर नाव कोरले होते. भारताने ही स्पर्धा सर्वाधिक आठ वेळा जिंकली. भारतीय संघ या स्पर्धेत हॉट फेव्हरेट समजला जातोय कारण भारतीय संघ या स्पर्धेतील सर्वात संतुलित संघ आहे. भारताचे सर्व खेळाडू अनुभवी असून फॉर्मात आहेत. डावखुरा युवा धडाकेबाज फलंदाज अभिषेक शर्मा आणि अनुभवी स्टायलिश फलंदाज शुभमन गिल यांची सलामीची जोडी प्रतिस्पर्धी गोलंदाजांवर तुटून पडली. तिसऱ्या क्रमांकावर युवा डावखुरा फलंदाज तिलक वर्मा येईल तो सध्या बॅडपॅच मधून जात असला तरी त्याची बॅट कधीही तळपू शकेल. तिलक वर्मा जर फॉर्मात आला तर भारताला या स्पर्धेत विजेतेपद मिळवण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. हार्दिक पांड्या हा अनुभवी अष्टपैलू खेळाडू संघात असल्याने संघाचे संतुलन वाढले आहे. वेगवान गोलंदाजीची धुरा अनुभवी जसप्रीत बुमरा आणि युवा अर्षदीप सिंग तसेच हर्षित राणा सांभाळतील तर फिरकी गोलंदाजीची धुरा अनुभवी अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यांच्यावर आहे. त्यांना मिस्ट्री फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीची साथ लाभेल. भारतच या स्पर्धेचा प्रबळ दावेदार मानला जात आहे. भारताला या स्पर्धेत जर कोणी आव्हान देऊ शकेल तर तो पाकिस्तान. भारत आणि पाकिस्तान यांच्यात १४ सप्टेंबर रोजी लढत होणार असून या लढतीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. नेहमीप्रमाणे भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये होणारा हा सामना रंगतदार होईल यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर नंतर पहिल्यांदाच हे दोन्ही संघ आमने सामने येत असल्याने या सामन्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. अलीकडच्या काळात पाकिस्तानची कामगिरी चांगली झालेली नाही. त्यांचा माजी कर्णधार बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान नावाचा त्यांचा विकेट किपर बॅट्समनला संघातून वगळले आहे फॉर्म हरपल्याने त्यांना संघातून बाहेर वगळण्यात आले आहे. त्यांच्या संघात कर्णधारासह अनेक खेळाडू नवखे आहेत. त्यांचा संघ नवखा असला तरी भारताविरुद्ध ते जीव तोडून खेळतात हा त्यांचा इतिहास आहे. पाकिस्तानी संघात नवीन खेळाडू असले तरी त्या संघास कमी लेखण्याची चूक भारतीय संघ करणार नाही. भारताविरुद्ध चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न ते नेहमीच करत असतात. त्यांच्याकडे दर्जेदार वेगवान गोलंदाज आहे. भारतीय फलंदाजांना बाद करण्यासाठी ते जीवाचे रान करतील यात शंका नाही त्यामुळेच हा सामना रंगतदार ठरेल. या स्पर्धेत भारत पाकिस्तान एकदा नव्हे तर तीनदा आमने सामने येतील अशी शक्यता आहे. १४ सप्टेंबर नंतर सुपर फोर मध्येही हे दोन्ही संघ एकमेकांना भिडतील आणि तिथे चांगली कामगिरी केली तर कदाचित अंतिम फेरीतही दोन्ही संघ समोरासमोर येतील. भारत या स्पर्धेतील प्रबळ दावेदार असला तरी टी २० स्पर्धेत कोण विजयी ठरेल हे कोणीही छातीठोकपणे सांगू शकत नाही मात्र मागील कामगिरीचा आणि सध्या असलेल्या फॉर्मचा विचार करता भारतच या स्पर्धेत अजिंक्य ठरेल आणि आशिया चषकावर नवव्यांदा नाव कोरेल असा विश्वास १५० कोटी देशवासियांना आहे. आशिया चषकासाठी भारतीय संघाला मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार दौंड, जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# बारवाले महाविद्यालयात कार्यशाळा उत्साहात संपन्न

जालना । प्रतिनिधी - भारत सरकारकडून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या महत्वाकांक्षी योजनांना फ्लॅगशिप कार्यक्रम म्हटले जाते. या कार्यक्रमांचे उद्दिष्ट युवक व विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण करणे, देशाला डिजीटल व कौशल्य संपन्न बनवणे तसेच समाजातील सर्व घटकांचा समावेशक विकास साध्य करणे हे आहे. याच उद्देशाने युवा बहुद्देशीय सेवाभावी संस्था, जालना व बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत दि.९ सप्टेंबर २०२५ रोजी वर्कशॉप ऑन फ्लॅगशिप प्रोग्राम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रम जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. कविता प्रशार होत्या. यावेळी जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर, सायबर पोलिस ठाण्याचे गोरख भवर व विजय खरात, कैलास काळे तसेच एस. एम. काजी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रस्तावना एस. एम. काझी यांनी केली, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शगुन परिदा यांनी केले. यावेळी एस. एम. काझी यांनी आपल्या प्रस्ताविकेत विद्यार्थ्यांना या कार्यशाळेचे महत्त्व पटवून सांगितले. यावेळी संगणक विभागातर्फे सायबर फ्रॉड आणि स्किल इंडिया विषयक पोस्टरचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सायबर पोलीस ठाण्याचे गोरख भवर व विजय खरात यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी ऑनलाईन सायबर फसवणूक कशी होते, ती टाळण्यासाठी कोणकोणते उपाय करता येतील यावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना ओटीपी शेअरिंग, फेक लिंक, फिशिंग, सोशल मीडिया हॅकिंग यांसारख्या सायबर गुन्ह्यांची उदाहरणे देत सावधगिरीचे उपाय सांगितले. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी विविध शंका उपस्थित केल्या व अधिक माहिती मिळविली. यानंतर मातोश्री स्किल डेव्हलपमेंट सेंटरचे संचालक कैलास काळे यांनी स्किल इंडिया योजनेबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांची, रोजगार संधींची व करिअरमध्ये होणाऱ्या फायद्यांची माहिती दिली. काळे यांनी विशेषतः डिजिटल स्किल्स, उद्योजकता प्रशिक्षण, उद्योगसंबंधीत कौशल्यविकास यावर भर दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगणक विभागातील वैशाली शिंदे, रोशनी सुरा, गायत्री कोंबे, कांचन कायंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच युवा बहुद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड, महाविद्यालयीन कर्मचारी सुंदर वायाळ, सुरेश खरात, शिवाजी जोशी, नरेंद्र देशमुख आदी उपस्थित होते.

# प्रेषित मोहम्मद संपूर्ण विश्वासाठी कृपा आणि दयेचे स्रोत - प्रा. वाजेद खान

## जाफराबाद येथे प्रेषित परिचय कार्यक्रम




**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद** - ईश्वराने प्रेषित मोहम्मद यांना केवळ एका विश्वासाठी नव्हे तर तब्बल सात विश्वासाठी कृपा आणि दयेचा स्त्रोत म्हणून या भूतलावर पाठविले. संपूर्ण मानव जात ही एकाच मातापित्याची संतान असून सर्वांशी प्रेमाने वागणे हाच खरा धर्म आहे. या विश्वाचा निर्माता एकच ईश्वर असून या जीवनात त्याची ओळख करून प्रत्येकाने आपल्या पृथ्वीतलावरील व पारलौकिक जीवनाचे सार्थक करून घ्यावे. असा महान संदेश प्रेषित मोहम्मद यांनी आज पासून १४६० वर्षापूर्वी संपूर्ण विश्वाला दिला. पवित्र धर्मग्रंथ कुराण आणि प्रेषित मोहम्मद यांची जीवनी यामाध्यमातून शांती सुरक्षितता आणि समर्पणाची एक महान जीवन प्रणाली प्रेषित मोहम्मद यांनी संपूर्ण विश्वाला दिली. ज्यात प्रत्येक मानवी समस्यांचे निराकरण सामावले आहे. असे विचार इस्लामचे गाढे अभ्यासक तथा जमाते इस्लामी हिंद नाशिकचे अध्यक्ष प्राध्यापक वाजिद अली खान यांनी व्यक्त केले. जाफराबाद येथे रविवारी जमाते इस्लामी ही तर्फे आयोजित प्रेषित परिचय कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य र.तू. देशमुख, डॉ. पी.जी. देशमुख, अब्दुल खुद्दुस, कुंडलिक मुठ्ठे, ज्ञानेश्वर निकम, हबीब ऐदरुस चाऊस, कबीर बाबा आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात हाफिज सय्यद नाझीम यांच्या कुराण पठणाने झाली. यावेळी प्राचार्य र.तू. देशमुख यांनीही पवित्र धर्मग्रंथ कुराण मध्ये प्रत्येक मानवी समस्येचे निराकरण केले असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. पी. जी. देशमुख, अब्दुल खुद्दुस, कुंडलिक मुठ्ठे यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जमाते इस्लामी हिंदचे जाफराबाद शहराध्यक्ष मुमताज अली खान यांनी केले. सूत्रसंचालन असलम पठाण व रिजवान शेख यांनी केले. आभार नसीम शेख यांनी मानले. कार्यक्रमाला सर्वधर्मीय समाज बांधवांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी जमाते इस्लामी हिंदचे मुमताज अली खान, ताहेर काझी, एकबाल खान, तालेब पठाण, युनूस खान, इद्रिस खान, शेख रिजवान, शेख नसीम आदींसह युथ मुव्हमेंट ऑफ महाराष्ट्र, एस. आय. ओ. तथा जमाते इस्लामी हिंद च्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

# कै.सौ. कमलताई जामकर उत्कृष्ट महिला शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थिनी गौरव पुरस्कार आत्मिक बळ देणारा -ॲड. किरणराव सुभेदार



**परभणी । प्रतिनिधी** - नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था , परभणी आणि जामकर परिवाराच्या वतीने कै. सौ. कमलताई जामकर यांचे जयंती निमित्त आयोजित कै.सौ. कमलताई जामकर उत्कृष्ट महिला शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, आणि विद्यार्थिनीं गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात अध्यक्षिय समारोप प्रसंगी ड.किरणराव सुभेदार बोलताना म्हणाले की, कै.सौ.कमलताई जामकर उत्कृष्ट महिला शिक्षक , कर्मचारी , आणि विद्यार्थिनी गौरव पुरस्काराने स्त्री सन्माना बरोबरच शिक्षण क्षेत्रात ज्ञानदाना बरोबरच अधिक चांगले विद्यार्थी घडावे म्हणून काम करण्याची प्रेरणा मिळते.ज्यायोगे पुरस्काराच्या मानकरी यांना आत्मिक बळ लाभते.

कै.सौ.कमलताई जामकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांचे हस्ते पुजन करुन कमल गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ड. किरणराव सुभेदार ( उपाध्यक्ष,नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था,परभणी ), पुरस्कार प्रदानकर्ते तथा प्रमुख अतिथी हेंमतराव जामकर , (अध्यक्ष, नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था, परभणी ) संस्थेचे संचालक ड.बाळासाहेब जामकर, सौ. दिपलक्ष्मीताई जामकर,सौ.कविताताई सुभेदार ,सदस्य सौ.संध्याताई जामकर ,सचिव विजयराव जामकर , संचालक गोविंदराव नांदापूरकर , संग्रामभैय्या जामकर ,सदस्या सौ. वसुंधराताई जामकर,सौ.नेहाताई जामकर, राजपाल जामकर , सौ. राजविराताई जामकर, राजनंदिनीताई जामकर ,

प्र.प्राचार्य डॉ.संगीता आवचार, मुख्याध्यापक जी.एन.शिंदे, प्र.मुख्याध्यापक मनोहर पुरी , मुख्याध्यापक सौ.जयश्री हत्तीअंबीरे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संगीता आवचार यांनी केले. प्रा.डॉ.पल्लवी कुलकर्णी ( कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी. ) यांना उत्कृष्ट महिला शिक्षक , तर कु. प्रिया दिलीप जोशी उत्कृष्ट विद्यार्थीनी. ( कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय , परभणी.) श्रीमती तुरुकमाने एस.व्ही उत्कृष्ट महिला शिक्षक, कै.रावसाहेब जामकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जिंतूर रोड,परभणी तर कु. आराध्या बालासाहेब कानडे उत्कृष्ट विद्यार्थिनी. मुख्याध्यापक सौ.जयश्री हत्तीअंबीरे उत्कृष्ट महिला शिक्षक तर कु.पुजा नारायण जाधव उत्कृष्ट विद्यार्थीनी नूतन प्राथमिक शिक्षणालय, जिंतूर रोड ,परभणी. श्रीमती विजया गोडगोडवार उत्कृष्ट शिक्षिका,तर ए.आर.इघारे उत्कृष्ट प्रशासकिय कर्मचारी,कु. वैष्णवी नरेंद्र जोशी उत्कृष्ट विद्यार्थिनी नूतन मुला मुलींचे हायस्कूल,वडगळी, परभणी. अशा उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्हे, शाल,रोख रक्कम देवून सन्मानित करण्यात आले. सचिव विजयसिंह जामकर आणि नूतन कर्मचारी पतसंस्था परभणीच्या वतीने कु. श्रद्धा अनंत पंढरकर या विद्यार्थिनीच्या इयत्ता सातवी पासून पुढील सर्व शिक्षण पूर्ण होई पर्यंत कमलताई जामकर दत्तक विद्यार्थीनी म्हणून शिक्षणाबाबत सर्वतोपरी खर्चाची जबाबदारी सचिव विजयराव जामकर यांनी स्विकारली. स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय बाण्यातून १९१६ साली या संस्थेची स्थापना करण्यात आली.माजी मंत्री भारतभूषण रावसाहेब जामकर ,आणि राजाभाऊ सुभेदार,

ड.बाळासाहेब सुभेदार यांच्या योगदानातून संस्थेचा विकास झाला.आज जामकर आणि सुभेदार परिवाराच्या योगदानातून सर्व प्रशाले सह महाविद्यालयाची प्रगती होत आहे.या संस्थेत काम करणाऱ्या महिला शिक्षक , कर्मचारी व विद्यार्थिनी यांच्यासाठी कै.सौ.कमलताई जामकर उत्कृष्ट महिला पुरस्कार तर पुरुषांसाठी उत्कृष्ट शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी यांना सुभेदार बंधू यांच्या नावे पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला जात आहे. संस्थाध्यक्ष हेमंतराव जामकर यांचे नेतृत्वात आम्ही सामाजिक बांधिलकी जपत कार्य करत आहोत.नविन पीढीला प्रोत्साहन मिळावे ,स्मरण व्हावे... कामी नूतन परिवारातील सर्व घटकांचे विशेष योगदान लाभत असल्याचे समाधान ड.किरणराव सुभेदार यांनी व्यक्त केले. कमलताईंच्या जयंती निमित्त स्नेहबंध या वृद्धाश्रमास फॅन भेट आणि नूतन प्राथमिक शिक्षणालयास शालेय साहित्य देण्यात आले. या वेळी पुरस्कार प्राप्त मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.प्रसंगी समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित निबंध स्पर्धेचे विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते मान्यवरांच्या हस्ते बक्षिस देवून सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत डॉ. आशा गीरी यांनी आभार व्यक्त केले.

# प्रत्येक तालुक्यातून दोन शिक्षकांना आदर्श पुरस्कार द्या

## प्राथमिक शिक्षक संघाची मागणी

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी** - जालना जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी प्रत्येक तालुक्यातून एक प्राथमिक आणि एक माध्यमिक शिक्षक यांची आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी केली जाते मात्र यावर्षी अशा पद्धतीने निवड न करता फक्त जिल्ह्यातून तीन शिक्षकांना आदर्श पुरस्कार जाहीर करण्यात आला असून असे न करता वंचित राहिलेल्या तालुक्यातील शिक्षकांना देखील आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने करण्यात आली आहे.याविषयी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की दरवर्षी जिल्ह्यातील १७ शिक्षकांना आदर्श पुरस्कार देण्यात येतो मात्र यावेळी फक्त ३ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आल्याने जिल्ह्यातील ५तालुके आणि १४ शिक्षक या पुरस्कारापासून वंचित आहेत. याशिवाय प्राथमिक शिक्षकांमधून पात्र असलेल्यांना विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, प्राथमिक पदवीधर या पदावर पदोन्नती देण्यात यावी, आगाऊ वेतनवाढी फरक देयके, वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके आणि अन्य देयकांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशा मागण्या निवेदनातून करण्यात आलेले आहेत. निवेदनावर प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवानराव भालके, सरचिटणीस शांतीलाल गोरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

युवा आदर्श
जालना बुधवार, दि १० सप्टेंबर २०२५ E-mail- yuva.aadarsh@gmail.com


# जिल्ह्यात प्राणी कल्याण कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना | प्रतिनिधी -** नागरिकांनी पाळीव व वन्य प्राण्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे गरजेचे आहे. नागरिकांच्या मनात भूतदया असली पाहिजे. गोवंशाचे रक्षण, संगोपन व संवर्धनासाठी नागरिकांचे सहकार्य व योगदान आवश्यक आहे. तरी जिल्ह्यात विविध प्राण्यांचे छळ होवू नये, यासाठी जिल्ह्यात प्राणी कल्याण कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी जालना त्रैमासिक सभा मंगळवार दि.९ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्त डॉ. प्रशांत चौधरी, पशुसंवर्धनचे सहायक आयुक्त डॉ.संदीप पाटील यांच्यासह संबंधित विभागाचे शासकीय सदस्य व अशासकीय सदस्यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, प्राणी क्लेष प्रतिबंधक कायदा १९६० नूसार कोणत्याही प्राण्याचे पालकत्व धारण करणाऱ्या व्यक्तीने त्या प्राण्याची काळजी घेणे व त्यांना अनावश्यक वेदना व त्रास होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक आहे. तसेच वेदनादायी पध्दतीने प्राण्यांना हाताळणे किंवा वाहनातून घेवून जाणे यालाही प्रतिबंध करण्यात आलेला आहे. बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांची गय केली जाणार नाही असे सांगून जिल्ह्यातील भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या नियंत्रित करण्याबाबतही ठोस पाऊले उचलावी, असे निर्देशही संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीत विविध प्राणी कल्याण विषयीच्या कामकाजाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जंगली पक्षी व स्थलांतरीत पक्षी यांच्या शिकारीबाबत कायदेशीर कारवाईबाबत उपाययोजना करणे, प्राणी क्लेष प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा १९७६, गायींची कत्तल करण्यास मनाई, अनुसूचित प्राण्यांच्या कत्तलीवरील निर्बंध, शास्ती, या अधिनियमातील सर्व अपराध हे दखलपात्र आहेत, महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५, गोवंशाच्या (गाय, वळु, बैल) कत्तलीस मनाई, शिक्षेची तरतुद तसेच दि.४ मार्च २०१५ पासून राज्यात गाय, वासरे, बैल व वळु या संपुर्ण गोवंशाची कत्तल करण्यास बंदी असल्याने या विभागाने जनावरांची कत्तलपुर्व तपासणी प्रमाणपत्र देणे पूर्णतः बंद केले आहे, अशी माहिती पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्त डॉ. प्रशांत चौधरी यांनी यावेळी दिली. तसेच जिल्ह्यात महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ तसेच प्राणी क्लेष प्रतिबंधक कायदा १९६० चे उल्लंघन होत असल्यास, गोवंशाची कत्तल अथवा वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ जवळच्या पोलिस ठाणे, पोलिस नियंत्रण कक्ष, पशुसंवर्धन विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी पशुसंवर्धन विभागाने टोल फ्री क्र. १८०० २३३ ०४१८ हा उपलब्ध करुन दिलेला आहे. जनावरांची वाहतुक करण्यासाठी स्वास्थ प्रमाणपत्र तसेच वाहतुक प्रमाणपत्र सोबत बाळगणे बंधनकारक आहे. अशी माहितीही यावेळी देण्यात आली.

## हैद्राबाद गॅझेटियरच्या आधारावर बंजारा समाजाला एसटी दर्जा द्या

### आमदार लोणीकर यांची मुख्यमंत्र्याकडे पत्राद्वारे मागणी

**परतूर | प्रतिनिधी -** परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी ०८ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून मराठवाड्यातील बंजारा समाजाला हैद्राबाद स्टेट गॅझेटियर (१९२०) च्या आधारावर अनुसूचित जमाती (एसटी) दर्जा देण्याची मागणी केली आहे. मराठवाडा हा १९४८ पर्यंत निजामाच्या हैद्राबाद राज्याचा भाग होता. त्या काळातील हैद्राबाद गॅझेटियर १९२० मध्ये बंजारा (लमाण/सुगळी) समाजाला अनुसूचित जमाती म्हणून नमूद केले आहे. यात मराठवाडा भागात त्यांच्या मोठ्या वस्त्याचा उल्लेख आहे. महाराष्ट्रात १९५६ नंतर बंजारा समाजाला ओबीसी किंवा विमुक्त जाती/देनोटिफाईड ट्राइब्स (व्हीजेएनटी) प्रवर्गात समाविष्ट केले गेले. मात्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात त्याच गॅझेटियरच्या आधारावर त्यांना एसटी दर्जा मिळाला आहे. ०२ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार मराठा समाजाला हैद्राबाद गॅझेटियरच्या आधारावर कुणबी (ओबीसी) आरक्षण देण्यात आले. त्याच धर्तीवर बंजारा समाजाला एसटी दर्जा



देऊन त्यांना शिक्षण, नोकऱ्या आणि विकास योजनांमध्ये ७% आरक्षणाचा लाभ द्यावा अशी विनंती माजी मंत्री, आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात केली आहे.

मराठवाड्यातील जालना, बीड, नांदेड आदी जिल्ह्यांमध्ये बंजारा समाजाची मोठी लोकसंख्या आहे. हा समाज ऐतिहासिकदृष्ट्या भटक्या व्यापारी आणि पशुपालक जमात म्हणून ओळखला जातो. लोणीकर यांनी शासनाकडे गॅझेटियर उताऱ्यांची पडताळणी करून केंद्र सरकारच्या जनजाती मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठवण्याची मागणी केली आहे.

## छत्रपती संभाजीनगर ते हसनाबाद मुक्कामी बससेवा पूर्ववत सुरु करून राजूरसाठी दर दोन तासाला बससेवा सुरु करा - बाबासाहेब कोलते

**जालना | प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगर ते हसनाबाद, वजीर खेडा मुक्कामी बस सेवा पूर्ववत सुरु करून राजूर गणपतीसाठी दर दोन तासाला बस सेवा सुरु करण्याची मागणी भाजपा जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बाबासाहेब पाटील कोलते यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व विभाग नियंत्रक छ. संभाजीनगर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व विभाग नियंत्रक छत्रपती संभाजीनगर यांना दिलेल्या निवेदनात बाबासाहेब कोलते यांनी म्हंटले आहे की, छत्रपती संभाजीनगर ते हसनाबाद व वजीरखेडा ता. भोकरदन हि परिवहन महामंडळाची एस.टी. बस सेवा चार ते पाच वर्षापूर्वी चालू होती व छत्रपती संभाजीनगर डेपोची बस हि रात्री हसनाबाद येथे मुक्कामी राहत असल्यामुळे सकाळी हसनाबाद वजीरखेडा परिसरातील नागरिकांना व शालेय विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजीनगर येथे येणे-जाणेसाठी अत्यंत सोयीचे होते. परंतु गेल्या पाच वर्षापासून छत्रपती संभाजीनगर आगाराने हसनाबाद व वजीरखेडा मुक्कामी असणारी एस.टी. बस सेवा बंद केल्यामुळे टाकळी कोलते तळेगाव रिधोरा देवी, धानोरा, पिंपळगाव कोलते, पीरबावडा, गेवराईगुंगी, पिंप्री तळेगाव, एकेफळ आदीसह गावातील नागरिकांना व शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत असून ग्रामीण भागातून छत्रपती संभाजीनगर फुलंब्री येथे शिक्षणासाठी येणारे विद्यार्थ्याची जाणे-येण्याची हाल होत असल्यामुळे ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यातच छत्रपती संभाजीनगर आगाराने राजूर गणपती साठी अत्यंत मोजक्या प्रमाणात बस सेवा असून सकाळी ८ वाजेनंतर १२ वाजेपर्यंत छत्रपती संभाजीनगर कडून राजूर गणपतीकडे जाणे-येणे साठी बस सेवा नाही त्यामुळे टाकळी कोलते, पीरबवडा, तळेगाव, व हसनाबाद परिसरातील शालेय विद्यार्थी यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. राजूर गणपती मुक्कमी बस ही सकाळी ८ वाजताच छत्रपती संभाजीनगर येथे पोहचत असल्यामुळे ८ वाजेनंतर राजूर येथून शालेय विद्यार्थ्याना बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. छत्रपती संभाजीनगर ते राजूर गणपती एस.टी. बस सेवा प्रत्येकी दोन तासाला सुरु करावी म्हणून यापूर्वी आगार



व्यवस्थापक छ. संभाजीनगर यांना बदनापूर विधान सभेचे आमदार नारायणराव कुचे व फुलंब्री विधानसभा चे आमदार अनुराधाताई चव्हाण यांनी दि. ०९/०२/२०२५ रोजी पत्र दिले आहे परंतु अद्याप या बाबत रा.प. महामंडळाने कोणतीच कार्यवाही केली नाही. पूर्वीप्रमाणे छत्रपती संभाजीनगर ते हसनाबाद वजीर खेडा हि मुक्कमी एस.टी. बस सेवा पूर्ववत सुरु करावी व शालेय विद्यार्थ्याचे गैरसोय थांबवावी तसेच छत्रपती संभाजीनगर ते राजूर गणपती प्रत्येकी दोन तासाला एस.टी. बस सेवा सुरु करावी अन्यथा शालेय विद्यार्थी व नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा बाबासाहेब कोलते यांनी निवेदनात दिला आहे.

## पालकांच्या हस्ते कराटे विद्यार्थ्यांना बेल्ट व प्रमाणपत्राचे वाटप



**परतूर | प्रतिनिधी-** परतूर येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानावर दि.८/९/२०२५ रोजी सायंकाळी सहाच्या दरम्यान कराटे विद्यार्थ्यांना बेल्ट व प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष, राजू सावंत,प्रमुख पाहुणे, संगमेश्वर रकटे.पुंडलीक बरेवाड.व पालक,मारोती मॅकेवार. रामेश्वर भामट.रामभाऊ सोनपसारे. सौ.शोभाबाई चव्हाण. सौ.दिपाली शेटे.हे उपस्थित होते.सोतोकान कराटे डो इंडियाचे कराटे मास्टर, माणिक जैस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली बेल्ट टेस्ट घेण्यात आली होती.या बेल्ट टेस्ट मध्ये उत्तीर्ण झालेले एकुण १९, विध्यार्थी.रेहान शेख.(ब्रॉन बेल्ट.२) शेख मोहम्मद मलिक.(ब्रॉन बेल्ट.२) शिवम मोताळे.बिल्यू बेल्ट.राबीया सिद्दीकी.बिल्यू बेल्ट. पुर्वा मॅकेवार.बिल्यू बेल्ट.साद शेख. यलो बेल्ट.श्रीतेज भामट.यलो बेल्ट.आयान खान.यलो बेल्ट.मान्यता चव्हाण.यलो बेल्ट. अनन्या लाळे.यलो बेल्ट.अदीती वाघमरे.ऑरेंज बेल्ट.हिंदवी झरेकर.ऑरेंज बेल्ट. आरोही शेटे.ऑरेंज बेल्ट. ओवी कुळकर्णी.ऑरेंज बेल्ट. संस्कृती झरेकर.ऑरेंज बेल्ट. श्रेजल सावंत.ऑरेंज बेल्ट.आदीत्य प्रधान.ऑरेंज बेल्ट.उमर काजी.ऑरेंज बेल्ट.जगजीतसिंग जुनी. ऑरेंज बेल्ट. यांचा समावेश होता.यावेळी विद्यार्थ्यांचा पालकांच्या वतीने सत्कार करण्यात आला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांचे जालना नगरीत आगमन झाल्याने त्यांचा सत्कार करतांना जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख. सोबत शहराध्यक्ष नंदकिशोर जागंडे, शहर उपाध्यक्ष तय्यबबापू देशमुख, धनंजय देशमुख आदी.**

## प्रसिद्ध कवयित्री डॉ.संजीवनी तडेगावकर यांना मातृशोक

**जाफ्राबाद | प्रतिनिधी -** मराठवाडा साहित्य परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणी संचालिका, भावकवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांच्या मातोश्री गं. भा. मथुराबाई रखमाजी जरक ( ८६) यांचे सोमवारी ( ता. ०८) सकाळी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रेवकी- देवकी ता. गेवराई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगी ,जावई, नातवंडे ,भाऊ असा परिवार असून सेवानिवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी मधुकर देवळे, छ. संभाजीनगर यांच्या त्या भगिनी तर म. सा. प. जालना शाखेचे सचिव पंडितराव तडेगावकर यांच्या त्या सासू होत्या.

